


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784



वर्ष ३ रे अंक : २२ वा बुधवार दि. १९ फेब्रुवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# वाळू वाहतूक खून प्रकरणातील आरोपीच्या पित्याने आवळला गळफास!

## चिठ्ठीत लिहून ठेवले मोबाईल पहा...व्हिडिओ झाला व्हायरल! -मरणांती म्हणाले..माझा मुलगा निर्दोष!

**जनसंचलन/बुलढाणा**

लोखंडी टामिने डोक्यात प्रहार करून इरला पुला खाली धामना नदीपात्रात उमेश साहेबराव फदाट यांचा ७ फेब्रुवारीच्या मध्यरात्री वाळू वाहतूक स्पर्धेतून खून झाला होता. याप्रकरणी वैभव ज्ञानेश्वर भोपळे व पवन ज्ञानेश्वर बकाल यांना पोलिसांनी अटक केली.परंतु काल आरोपी वैभव यांचे वडील ज्ञानेश्वर भोपळे यांनी मुलगा निर्दोष असल्याच्या मानसिकतेतून गळफास लावून आत्महत्या केली असून, त्यांनी एका चिठ्ठीत व्हिडिओ पहा असे लिहून मोबाईल मध्ये व्हिडिओ देखील व्हायरल केला आहे.हा व्हिडिओ हॅलो बुलढाणा च्या हाती लागला असून,यातून या खून प्रकरणातील मास्टरमाईंडचा शोध लागू शकतो. प्रकरण धाड पोलिस अंतर्गत आहे. मृतक उमेश फदाट बोरगाव फदाट या गावातीलच रेती वाहतुकीचा धंदा करणाऱ्या अंबादास कोलते यांच्या टिप्पर वर क्लीनर म्हणून काम करत होते.७ फेब्रुवारी च्या रात्री बारा वाजता ते धामणा नदी पात्राकडे गेले होते.दरम्यान तेथे वैभव ज्ञानेश्वर भोपळे याच्याशी रेती वाहतुकीवरून त्यांचा काही वाद झाला.यावेळी पवन ज्ञानेश्वर बकालही तेथे हजर होते.दरम्यान हा वाद विकोपाला गेला आणि आरोपी वैभवने लोखंडी टामीने उमेश फदाट यांच्या डोक्यावर जोरदार वार केला. त्यामुळे उमेश रक्तबंबाळ होऊन जागीच गतप्राण झाले. यावेळी दुसरा आरोपी पवन बकाल याने सांडलेल्या रक्तावर जेसीबीच्या साहाय्याने वाळू टाकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.याप्रकरणी मृतकाच्या भावाने पोलिसात तक्रार दिल्यावरून दोघाही आरोपींना अटक करण्यात आली,परंतु आरोपी वैभव भोपळे निर्दोष असल्याच्या मानसिकतेतून वैभव चे वडील ज्ञानेश्वर भोपळे यांनी फाशी घेऊन आत्महत्या केली आहे.त्यांच्या जवळ एक चिठ्ठी सापडली असून,त्यात लिहिलेले होते की मोबाईल बघा... आत्महत्या करते वेळी काय म्हणाले ज्ञानेश्वर जी? माझा मुलगा वैभव भोपळे हा मामाच्या गावी लहानपणापासूनच राहत होता.. घटना घडली तेव्हा गावात एक कार्यक्रम होता.रात्री दोन वाजता दत्तू फदाट याने वैभवला जीपमध्ये नेले होते.त्याचा जो प्लान होता तो त्याने यशस्वी केला.मध्यरात्री तीन वाजता गेली.त्यानंतर दत्तू फदाट परतला त्याने गाडी लावली.माझा मुलगा वैभव सकाळपर्यंत नदीत पात्रताच होता.त्याच्या सोबत ड्रायव्हर देखील होता.दरम्यान गावातील




रस्त्यावर दत्तू फदाट उभा होता.त्याने मृतक उमेशचा फोन दिला.दरम्यान वैभव वर आळ घेण्यात येऊन गुन्हा नोंदविण्यात आला.दुसरे गावचे आहे असे म्हणून दबाव आणण्यात आला.याची आता सखोल चौकशी होऊन चार ते पाच वाळू माफिया व मास्टरमाईंड यांचा पोलिसांनी शोध घ्यावा,अशी मागणी ही ज्ञानेश्वर भोपळे यांनी केली आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# |||| भेदभाव व विषमतेविरुद्ध सामुहिक प्रयत्न ||||

## संपादकीय लेख

जागतिक सामाजिक न्याय दिन, दरवर्षी २० फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो, सामाजिक न्यायाचा प्रचार आणि जगभरातील गरिबी, असमानता आणि भेदभाव यासारख्या समस्यांचे निराकरण करण्याच्या महत्त्वाची आठवण करून देतो. सामाजिक न्याय हे एक मूलभूत तत्त्व आहे जे शांततापूर्ण आणि समृद्ध समाजांना आधार देते, जिथे प्रत्येक व्यक्तीला समान हक्क, संधी आणि संसाधनांमध्ये प्रवेश असतो. जागतिक सामाजिक न्याय दिनाचे महत्त्व, त्याची उद्दिष्टे, आव्हाने आणि अधिक समान आणि न्याय्य समाजाला चालना देण्यासाठी सामूहिक कृतीची अत्यावश्यक गरज याविषयी सदर संकलित लेखातून माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी देताहेत... संपादक.

वर्ल्ड डे ऑफ सोशल जस्टिस जागतिक स्तरावर २० फेब्रुवारी हा जागतिक सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो. याची सुरुवात २००९मध्ये झाली. तेव्हापासून समाजाला वाळवीसारखी पोकळ बनवणारी सामाजिक दुष्कृत्ये, भेदभाव आणि विषमता संपविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक म्हणून दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. मानवी हक्क आणि जगात पसरलेली असमानता यांच्यामध्ये समाजातील संधी आणि विशेषाधिकारांच्या वितरणात न्याय प्रस्थापित करणे, हे सामाजिक न्यायाच्या कक्षेत येते. लोकांना सामाजिक न्यायाच्या महत्त्वाची जाणीव करून देण्यासाठी, संयुक्त राष्ट्रसंघ दरवर्षी २० फेब्रुवारी रोजी जागतिक सामाजिक न्याय दिवस साजरा करते. प्रयत्नांना गती देणे आवश्यक आहे. सत्य हे आहे की, आपण अजूनही सामाजिक न्यायाशी संबंधित असलेल्या लक्ष्यित उद्दिष्टापासून खूप दूर आहोत. समाजातील प्रत्येक घटकातील प्रत्येक व्यक्ती भय, शोषण, अन्याय, भेदभाव यापासून मुक्त होईल, तेव्हा सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे वास्तवात रूपांतर होईल. त्याला चांगली उपजीविका आणि सामाजिक सुरक्षा मिळेल. हे तेव्हाच शक्य आहे, जेव्हा आपण समाजाला प्रेरणा देण्यासाठी आपल्या सामूहिक आणि वैयक्तिक प्रयत्नांना गती देऊ.

आपल्या परस्परसंबंधित जगात, सर्व व्यक्तींसाठी समानता, निष्पक्षता आणि सन्मान सुनिश्चित करण्यासाठी सामाजिक न्यायाचा पाठपुरावा हे सर्वोच्च तत्त्व आहे. या प्रयत्नाचे महत्त्व ओळखून, आंतरराष्ट्रीय समुदायाने यंदा २० फेब्रुवारी हा जागतिक सामाजिक न्याय दिन २०२४ म्हणून नियुक्त केला. हा वार्षिक उत्सव भेदभाव, गरिबी, असमानता आणि जागतिक स्तरावर कायम असलेल्या इतर सामाजिक अन्यायांविरुद्ध सुरू असलेल्या संघर्षांची एक मार्मिक आठवण म्हणून काम करतो. जागतिक सामाजिक न्याय दिन, दरवर्षी २० फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो, सामाजिक न्यायाचा प्रचार आणि जगभरातील गरिबी, असमानता आणि भेदभाव यासारख्या समस्यांचे निराकरण करण्याच्या महत्त्वाची आठवण करून देतो. सामाजिक न्याय हे एक मूलभूत तत्त्व आहे जे शांततापूर्ण आणि समृद्ध समाजांना आधार देते, जिथे प्रत्येक व्यक्तीला समान हक्क, संधी आणि संसाधनांमध्ये प्रवेश असतो. हा निबंध जागतिक सामाजिक न्याय दिनाचे महत्त्व, त्याची उद्दिष्टे, आव्हाने आणि अधिक समान आणि न्याय्य समाजाला चालना देण्यासाठी सामूहिक कृतीची अत्यावश्यक गरज याविषयी माहिती देतो.

ऐतिहासिक संदर्भ असे- जागतिक सामाजिक न्याय दिनाची स्थापना संयुक्त राष्ट्र महासभेने सन २००७मध्ये केली होती, ज्याचा उद्देश गरिबी, बहिष्कार, लैंगिक असमानता, बेरोजगारी आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यांसारख्या समस्यांना तोंड देण्याच्या प्रयत्नांना चालना देण्याच्या उद्देशाने आहे. सामाजिक न्यायाच्या तत्त्वांमध्ये रुजलेला, हा दिवस पद्धतशीर असमानता दूर करण्यासाठी आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाची वचनबद्धता अधोरेखित करतो. नागरी हक्क चळवळ, कामगार चळवळ आणि लैंगिक समानतेसाठीच्या संघर्षांसह, इतिहासातील विविध सामाजिक न्याय चळवळींमधून ते प्रेरणा घेते.

सामाजिक न्याय काय आहे? तर आधुनिक समाजात सर्व लोकांना समान संधी आणि सुविधा मिळायला हव्यात, हा केवळ सामाजिक न्यायाचाच नव्हे तर, सर्व देशांचा आदर्श आहे. सामाजिक न्यायाचे ध्येय हे सुनिश्चित करणे आहे की, सर्व लोक त्यांच्या सामाजिक भूमिका पार पाडू शकतील आणि समाजाकडून ते पात्र आहेत. यासाठी समाजातील विविध संस्थांना अधिकार व कर्तव्ये दिली जातात जेणेकरून ही उद्दिष्टे साध्य करता येतील.

कधीपासून साजरा केला जातो हा दिवस? तर दि.२६ नोव्हेंबर २००७ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने जाहीर केले की, दरवर्षी २० फेब्रुवारी हा जागतिक सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जाईल. मानवतेला धोका निर्माण करणाऱ्या समस्येचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने या दिवसाची सुरुवात केली. समतेचा प्रसार करताना अन्याय आणि भेदभाव नष्ट करणे, हा त्याचा उद्देश आहे.

सदर दिन साजरा करण्यामागे उद्देश आहे- मानवतेला धोका निर्माण करणाऱ्या समस्येचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने जागतिक सामाजिक न्याय दिन या दिवसाची सुरुवात केली. समतेचा प्रसार करताना अन्याय आणि भेदभाव नष्ट करणे, हा त्याचा उद्देश आहे. याबाबत आपण समाजाला प्रेरणा देण्यासाठी आपल्या सामूहिक आणि वैयक्तिक प्रयत्नांना गती वाढवायला हवी. सन २०२२च्या जागतिक सामाजिक न्याय दिनाची थीम- औपचारिक रोजगाराद्वारे सामाजिक न्याय मिळवणे, ही होती. तर सन २०२१च्या जागतिक सामाजिक न्याय दिनाची थीम- डिजीटल अर्थव्यवस्थेतील सामाजिक न्यायासाठी आवाहन, ही होती. दैन्य, दारिद्र्य, जाती, धर्म, वर्ण, व्यवसाय किंवा जन्म यांवरून माणसामाणसांत भेदभाव होता कामा नये. प्रत्येकास सौजन्यपूर्ण वागणूक दिली गेली पाहिजे. तरच या दिनाचे महत्त्व अबाधित राहील.

!! जागतिक सामाजिक न्याय दिनाच्या सर्व बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !

# सैलानी यात्रा महोत्सवाचे नियोजन करावे पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांच्या सूचना...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा तालुक्यातील पिंपळगाव सराई येथे सैलानी बाबा यात्रा महोत्सव दि. ८ ते २३ मार्च या कालावधीत साजरा होणार आहे. या यात्रा महोत्सवात आवश्यक सोयीसुविधांचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सोमवारी त्यांच्या कार्यालयात यात्रेच्या पूर्व तयारीची समन्वय सभा घेतली. या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते. पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी सैलानी यात्रा महोत्सवात भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा, शौचालय, परिसर स्वच्छता,



पोलिस बंदोबस्त आदी सोयीसुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना दिल्या. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी आढावा घेत म्हणाले की, या यात्रेत देशभरातून ४-५ लाख भाविक सहभागी होण्याची शक्यता आहे. त्यानुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सीसीटिव्ही कॅमेरे बसवणे, महिला सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करणे, विद्युत सुविधा पुरविणे, स्वच्छता गृह तयार करणे, पार्किंग व्यवस्था निर्माण करणे, सार्वजनिक शौचालय उभारणे, अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित ठेवणे, पोलीस बंदोबस्त, बॅरिकेट्स, आरोग्य कक्ष व औषधींचा साठा उपलब्ध करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

# पार्टी बेतली जीवावर,एकाचा मृत्यू !

**जनसंचलन/ डोणगाव**

आरेगाव येथे मित्रांसोबत पार्टीसाठी गेलेल्या ५१ वर्षीय व्यक्तीचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे गावात खळबळ उडाली असून, पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. केशव रामभाऊ राक्षे असे मृतकाचे नाव आहे पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत केशव रामभाऊ राक्षे (वय ५१, रा.आरेगाव, ता. मेहकर) हे मित्रांसोबत आरेगाव शिवारात पार्टीसाठी गेले होते. काही वेळाने ते जमिनीवर पडलेले असल्याची माहिती गावकऱ्यांनी त्यांचा मुलगा संतोष केशव राक्षे (वय ३०) याला दिली. संतोष राक्षे आणि नातेवाईक घटनास्थळी पोहोचले असता, केशव राक्षे कोणतीही हालचाल करत नसल्याचे लक्षात आले. त्यांना




तातडीने ग्रामीण रुग्णालय, मेहकर येथे दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास पोलिस हवालदार कैलास गावडे करत आहेत. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, शवविच्छेदन अहवालानंतर तपासाची पुढील दिशा ठरणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नंदुरबार हादरलं! रस्त्याने चाललेल्या माय-लेकराला फॉर्च्यूनरने उडवलं, दोघांचाही जागीच मृत्यू....

**नंदुरबार :** शहादा शहरातील डोंगरगाव रस्त्यावर एका सुसाट फॉर्च्यूनर गाडीने पायी चालत असलेल्या आई व लेकाला जोरात धडक मारून उडवल्याची घटना १७ फेब्रुवारी रात्री दहा वाजेच्या सुमारास घडली. या भीषण अपघातात आई व मुलाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर भरधाव वेगात मोटरसायकल व चार चाकी वाहने जात-येत असतात. याबाबत बांधकाम विभागाला पंधरा दिवसांपूर्वीच गतिरोधक बसवण्यात यावे यासाठी निवेदन देण्यात आले होते. मात्र अधिकाऱ्यांच्या गलथान कारभारामुळे आई व मुलाला जीव गमवावा लागल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. शहादा शहरातील द्वारकाधीशनगर मध्ये राहणारे कल्पना गजानन वाघ व आकाश गजानन वाघ हे पायी डोंगरगाव रस्त्यावरून आपल्या घराकडे जात होते. त्याचवेळी तेथून जाणाऱ्या भरधाव फॉर्च्यूनर ( क्र. एम.एच. १५,जे. ए.५०५५ ) यावरील अज्ञात चालकाने कल्पना गजानन वाघ व आकाश गजानन वाघ या दोघांना जोरात धडक दिली. या भीषण अपघातात कल्पना गजानन वाघ व आकाश गजानन वाघ या मायलेकांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना १७ फेब्रुवारी रात्री दहा वाजेच्या सुमारास घडली. अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा शहादा शहरातील डोंगरगाव रस्त्यावर सायंकाळपासून पायी फिरणाऱ्या लोकांची मोठ्या प्रमाणावर नेहमीच वर्दळ असते. मात्र या परिसरात दुचाकी तसेच चार चाकी वाहनधारक भरधाव वेगाने जात असतात. याप्रकरणी पंधरा दिवसांपूर्वी या रस्त्यावर जागोजागी गतिरोधक बसविण्याची मागणी राष्ट्रवादीने निवेदनाद्वारे केली होती. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मायलेकाला जीव गमवावा लागला आहे. याबाबत नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. पोलीस प्रशासनाने भरधाव जाणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई करण्याची मागणी ही



करण्यात येत आहे.पायी चालत आपल्या घराकडे निघालेल्या माय लेकराच्या अशा अपघाती निधनामुळे परिसरात शोककळा पसरली आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी आणि वाहनांच्या वेगाला आवर घालण्यासाठीच नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागात रस्त्यांवर गतीरोधक बसवण्यासाठी निवेदन दिले होते. परंतु अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मायलेकाला जीव गमवावा लागल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# प्रवासी गाढ झोपेत, २५ जणांसह निघालेल्या बसला समृद्धी महामार्गावर अपघात




**वाशिम :** बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर खाजगी ट्रॅव्हल्सचा अपघात झाला आहे. या अपघातात एक प्रवाशी ठार झाला असून ७ ते ८ प्रवाशी गंभीर जखमी तर १५ ते २० प्रवाशी किरकोळ जखमी झाले आहे. पुण्यावरून नागपूरला जात असताना वाहन चालकाचे नियंत्रण सुटून किंवा झोपेची डुलकी लागल्याने ट्रॅव्हल्स पलटी होऊन हा अपघात झाला असावा असा अंदाज व्यक्त केल्या जात आहे. वाशिम जिल्ह्यातील मालेगाव जवळ समृद्धी महामार्गावर सकाळी ५ वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. पुणे वरून नागपुर कडे जात असलेल्या १२ ६६६७ क्रमांकाच्या राजलक्ष्मी ट्रॅव्हलचा समृद्धी महामार्ग चॅनेलनं २१५ वर नागपूर लेनवर वनोजा टोल प्लाझा पासून मालेगावकडे अंदाजे ५ किमीवर चालकाचे नियंत्रण सुटल्याने किंवा झोपेची डुलकी आल्याने अपघात झाल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. या अपघातात एका प्रवाशाचा मृत्यू झाला असून, सात ते आठ प्रवाशी गंभीर जखमी आणि १५ ते २० जण किरकोळ जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच सात ते आठ रुग्णवाहिकेतून जखमींना उपचारासाठी रवाना करण्यात आले आहेत.अपघाताची माहिती मिळताच वाशिम मंगरूळपीर मतदार संघाचे आमदार श्याम खोडे, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, मंगरूळपीर च्या तहसीलदार शितल बंडगर, ठाणेदार सुधाकर आडे, समाजसेवक पवन राठी, सचिन राणे यांनी घटनास्थळी पोहोचून सर्वधर्म संस्थापकलीन संस्थेचे श्याम सवई व श्री गुरु मंदिर रुग्णवाहिकेचे रमेश देशमुख यांना माहिती दिली. त्यांनी तात्काळ जय गुरुदेव रुग्णवाहिकेचे अनिकेत भेलांडे , बाळू राठोड संत गाडगेबाबा रुग्णवाहिकेचे शुभम खोड नवनिर्माण रुग्णवाहिकेचे विनोद खोड व लोकेशन कारंजा १०८ लोकेशन मालेगाव १०८ लोकेशन वनोजा १०८ शिवनी नांदगाव खंडेश्वर तसेच मंगरूळपीर मानोरा शेलुबाजार येथील उपकेंद्राच्या देखील रुग्णवाहिका घटनास्थळी हजर झाल्या होत्या. यावेळी कारंजा अग्निशामक दल, अग्निशामक दल मालेगाव ह्या देखील घटनास्थळी दाखल होऊन अपघातग्रस्तांना तात्काळ अकोला, मालेगाव कारंजा आणि शेलुबाजार येथे उपचारार्थ हलविण्यात आले. वृत्त लिहेपर्यंत मृतकाची ओळख पटली नसून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# मुलं चिडचिड करतात? उद्धटपणे उलट उत्तरं देतात? हट्टी व जिद्दी मुलांना अशी लावा शिस्त, रातोरात वागतील शहाण्यासारखी...






पूर्वीच्या काळात लहान मुलांना मोठ्यांचा आदर करणे, शिस्त पाळणे आणि संयम बाळगणे शिकवले जायचे. पण आजच्या काळात तंत्रज्ञान, बदललेली जीवनशैली आणि तणावपूर्ण वातावरण यामुळे लहान मुलांमध्ये रागाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. अनेक पालक त्यांच्या मुलांच्या वाढत्या रागाच्या स्वभावाने चिंताग्रस्त आहेत. सहजच चिडचिड करणे, कोणतीही गोष्ट न मिळाल्यास रागावणे किंवा भावनांवर नियंत्रण न ठेवणे, अशा अनेक समस्यांना मुलं आणि त्यांच्या पालकांना सामोरे जावे लागत आहे. या वाढत्या रागामागची कारणे कोणती? मुलांचा स्वभाव अधिक शांत आणि संयमी कसा करता येईल? योग्य पालकत्वाच्या पद्धती वापरून आपण मुलांना योग्य मार्गावर आणू शकतो का? या लेखात आपण या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करणार आहोत.आजच्या घडीला पालक व्यस्त जीवनशैलीत अडकले आहेत. सतत कामाचा ताण, मोबाइल आणि टीव्हीच्या आहारी गेलेला वेळ, मुलांसोबत संवादाचा अभाव, यामुळे मुलांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. त्यांना आई-वडिलांसोबत पुरेसा वेळ घालवता येत नाही आणि त्यामुळे ते आपली निराशा आणि एकाकीपणा रागाच्या स्वरूपात व्यक्त करतात. लहान वयातच मुलांमध्ये अस्वस्थता आणि चिडचिड वाढू लागते.आजची मुले टीव्ही, मोबाइल आणि व्हिडिओ गेम्सच्या आहारी गेली आहेत. याचा परिणाम त्यांच्या मेंदूच्या विकासावर होतो. सतत स्क्रीनसमोर वेळ घालवल्याने मुलांचे लक्ष विचलित होते, त्यांची एकाग्रता कमी होते आणि परिणामी, लहानसहान गोष्टींवर राग येऊ लागतो. संशोधनानुसार, तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर मुलांच्या भावनिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करतोपूर्वीच्या काळी मुले मैदानी खेळ खेळायची, धावपळ करायची आणि त्यामुळे त्यांच्या शरीरातील ऊर्जा योग्य प्रकारे खर्च होत असे. पण आजच्या काळात मोबाईल, व्हिडिओ गेम्स आणि घरातच वेळ घालवल्याने मुलांमध्ये शारीरिक हालचालीचा अभाव आहे. शरीरातील ऊर्जा न वापरल्याने चिडचिड वाढते, मन स्थिर राहत नाही आणि लहान मुलांना कुठल्याही गोष्टीत रस वाटत नाही. त्यामुळे त्यांच्यात आक्रमकता वाढण्याची शक्यता अधिक असते.

### अन्न आणि मानसिक संतुलन

अन्न आणि मानसिक आरोग्य यांचा खूप जवळचा संबंध असतो. आजच्या मुलांचे आहाराचे प्रमाण बदलले आहे. जंक फूड, साखरयुक्त पदार्थ आणि प्रोसेस्ड फूड मोठ्या प्रमाणात सेवन केल्याने मुलांमध्ये ऊर्जा कमी होऊन थकवा येतो आणि त्यांचा स्वभाव अधिक चिडचिडा होतो. संशोधन दर्शवते की योग्य आहार घेतल्यास मुलांचे मानसिक आरोग्य सुधारते आणि त्यांचा रागही कमी होतो. मुलांच्या आहारात पौष्टिक घटक, हिरव्या पालेभाज्या, फळे आणि योग्य प्रमाणात प्रथिने असणे गरजेचे आहे.

### योग्य पालकत्व आणि संवादाचे महत्त्व

पालकत्वाची भूमिका मुलांच्या स्वभावावर सर्वाधिक प्रभाव टाकते. पालकांनी आपल्या मुलांशी सतत संवाद साधणे गरजेचे आहे. त्यांच्यासोबत वेळ घालवा, त्यांचे प्रश्न समजून घ्या आणि त्यांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करा. राग ही समस्या नसून ते एका गोष्टीचे लक्षण आहे. त्यामुळे त्यांचे ऐकणे, त्यांना समजून घेणे आणि योग्य प्रकारे मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

मुलांमध्ये वाढता राग ही काळजी करण्यासारखी बाब आहे. परंतु योग्य पालकत्वाच्या सवयी, संतुलित आहार, पुरेशी शारीरिक हालचाल आणि संवाद वाढवल्यास हा प्रश्न सोडवता येऊ शकतो.

मुलांना आपले भावनात्मक संतुलन राखता यावे, यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच, पालकांनी आपल्या मुलांशी संवाद वाढवावा, त्यांना मैदानी खेळ खेळण्यास प्रवृत्त करावे आणि त्यांचा आहार नियंत्रित ठेवावा. यामुळे त्यांचे मानसिक आरोग्य सुधारेल आणि त्यांचा स्वभाव अधिक शांत आणि सकारात्मक बनेल.

# गाजर आणि शेवग्याच्या शेंगाने किडनी होईल स्वच्छ !, डॉक्टरांनी सांगितले सत्य...





मूत्रपिंडाच्या समस्या असल्यास, मळमळ आणि उलट्या यासारखी किरकोळ सुरुवातीची लक्षणे दिसून येतात. पण जर लक्ष दिले नाही तर ही परिस्थिती गंभीर बनते. म्हणून, दैनंदिन जीवनात मूत्रपिंडाचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. या प्रयत्नात, शेवगा आणि गाजर आश्चर्यकारक परिणाम देऊ शकतात.तुमच्या आहारात या दोन्ही गोष्टींचा समावेश करून तुम्ही किडनीशी संबंधित समस्यांपासून दूर राहू शकता. असा दावा यूट्यूब व्हिडिओंमध्ये करण्यात आला आहे. तुम्हाला या दाव्यावर विश्वास ठेवायचा आहे आणि ते वापरून पहायचे आहे की तुम्हाला त्याची चौकशी करून योग्य निर्णय घ्यायचा आहे? म्हणून, सजग फॅक्ट चेकच्या टीमने डॉक्टरांशी संवाद साधला . किडनीला सर्व प्रकारच्या आजारांपासून दूर ठेवण्याच्या टिप्स देण्यात आल्या आहेत. यापैकी एका प्रकरणात असा दावा केला जात आहे की गाजराचा रस मूत्रपिंडांना निरोगी ठेवतो. आणि ते दररोज सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. दुसऱ्या क्लिपमध्ये, मूत्रपिंड निरोगी ठेवण्यासाठी शेवग्याच्या शेंगाचा वापर उपयुक्त आहे असे मान्यत आले आहे. डॉक्टरांनी यासंबंधीचे दावे किती खरे आहेत आणि किती खोटे आहेत याबद्दल माहिती दिली आहे. मूत्रपिंडउपचारातकोणतीहीभूमिकानाही यासाठी आम्ही हैदराबाद येथील समन्व्य आयुर्वेदिक क्लिनिकच्या संस्थापक आणि मुख्य सल्लागार डॉ. स्निग्धा वर्तक, यांच्याशी संवाद साधला. किडनी उपचारात गाजर आणि शेवग्याची भूमिका शून्य असते. त्या म्हणताच की मूत्रपिंडाशी संबंधित आजार दूर करण्यात यापैकी कोणत्याही गोष्टीची थेट भूमिका नाही.

### शेवग्यामुळे स्राव वाढतो

शेवगा ही अशीच एक भाजी आहे जी तिची क्रियाशीलता वाढवून स्राव प्रक्रियेला गती देते. यामुळे विषारी पदार्थ बाहेर पडतात. मग मूत्रपिंडांवर जास्त लघवी तयार करण्यासाठी दबाव वाढतो. जास्त लघवीमुळे मूत्रमार्गात खडे होऊ शकतात. गाजराचा स्वभाव उष्ण आहे गाजर हे उष्ण स्वभावाचे आहे आणि कफ आणि वायू कमी करते. पण ते किडनीसाठी फायदेशीर मानले जाऊ शकत नाही.

### डॉक्टरांची मदत घेणे

मूत्रपिंडाच्या उपचारांसाठी डॉक्टरांची मदत घेण्याचा सल्ला देतात. त्यांच्या मते, धणे, ऊस आणि काकडी यासारख्या गोष्टी आहारात समाविष्ट कराव्यात. याशिवाय, समस्येनुसार वैद्यकीय सल्ल्यानुसार औषधे घेता येतात.

### हा निष्कर्ष आहे.

सजग फॅक्ट चेक टीमच्या तपासात किडनी उपचारांशी संबंधित हा दावा खोटा असल्याचे सिद्ध झाले आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच शेवगा आणि गाजराचा रस घ्यावा.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मॉर्निंग वॉकला निघाले असताना जीवघेणा हल्ला, पत्नीसमोरच पतीने सोडला जीव; हादरवणारी घटना




**पाटणा :** बिहारमधून खळबळजनक घटना समोर आली आहे. दाम्पत्य मॉर्निंग वॉकला निघाले असताना पत्नीसमोर पतीवर जीवघेणा हल्ला करण्यात आला. शहरातील टीपी वर्मा कॉलेजजवळ ही घटना घडली आहे. संजीव कुमार आपल्या पत्नीसह कॉलेजजवळून जात असताना काही बाईक स्वार तेथे आले आणि अचानक त्यांच्यावर चाकू भोसकला आणि तीन गोळ्या देखील झाडल्या. यामध्ये संजीव यांचा मृत्यू झाला आहे. संजीव कुमार हे बिहारमधील वीज विभागाच्या कार्यकारी सहाय्यक पदावर कार्यरत होते. ते आपल्या पत्नीसह वॉकसाठी निघाले असताना त्यांच्यावर अचानक हल्ला करण्यात आला. संजीव यांच्या पत्नी निशा बर्नवाल यांनी सांगितले की, दोन दरोडेखोर अचानक बाईकवरुन आले आणि त्यांनी माझ्या पतीला घेरले. मग त्यांच्यावर हल्ला केला. त्यानंतर मी ओरडू लागली तेव्हा त्यांनी माझे तोंड स्कार्फने बांधले आणि माझ्या पतीला मारुन टाकले. ही संपूर्ण घटना काही मिनिटांत त्यांच्या पत्नीसमक्ष घडली आहे. त्यानंतर गुन्हेगारांनी तेथून पळ काढला.

**खुनाचा कट रचल्याचा कुटुंबीयांचा संशय**

संजीव कुमार यांच्या कुटुंबीयांनी असा आरोप केला आहे की, ही घटना काही सामान्य नाही. कट रचून त्यांची हत्या करण्यात आली आहे. कुटुंबीयांनी असाही दावा केला की, जमिनीच्या वादातून शहरातील काही दुष्ट लोकांनी त्यांची हत्या केली आहे. या घटनेनंतर परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच एसडीपीओ जयप्रकाश सिंह घटनास्थळी पोहोचले. आणि तपास सुरू केला. त्यांनी सांगितले की, गुन्हेगारांना लवकरात लवकर अटक केली जाईल आणि कठोर कारवाई केली जाणार आहे. या घटनेपासून संजीव कुमार यांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. तर संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. पोलिसांनी मारेकऱ्यांना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी केली जात आहे.

# चीनची जोरदार सोने खरेदी; नव्या रणनितीने ड्रॅगन देणार अमेरिकेला धक्का?



**नवी दिल्ली:** अख्खा जगात सोने खरेदी करण्यासाठी रांग लागली आहे. सोन्याच्या उत्पादनात भारताचा शेजारी चीन हा जगातील पहिल्या क्रमांकाचा देश आहे. तरीही चीन कडूनही जोरदार खरेदी करण्यात येत आहे. वर्ल्ड गोल्ड कौन्सिलच्या अहवालानुसार, २०२३ मध्ये चीनने जगातील इतर देशांच्या तुलनेत सर्वाधिक म्हणजे ३७८.२ टन सोन्याचे उत्पादन केले होते. आता चीनने सोन्यासंबंधी रणनिती अंमलात आणण्यास सुरू केल्याची चर्चा आहे. ज्यावेळी जागतिक अर्थकारणात अनिश्चितता असते. त्यावेळी गुंतवणूकदार हे सोने खरेदी करण्यास सामान्यत: प्राधान्य देतात. चीनची जनताही यास अपवाद नाही.त्यामुळे लोक मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करत आहेत. दरम्यान, चीनमध्ये पारंपारिक गुंतवणूक पर्यायांमध्ये जसे की रिअल इस्टेट आणि स्टॉक मार्केटमध्ये इतर देशांप्रमाणे घसरण झाली आहे. त्यामुळे गुंतवणुकदारही या क्षेत्रात गुंतवणूक करण्यास तितकेसे उत्सुक नाहीत. अशा लोकांनी गुंतवणुकीचा सुरक्षित पर्याय म्हणून सोन्यात गुंतवणूक सुरू केली आहे. चीनची मध्यवर्ती बँकही सातत्याने आपले गोल्ड रिझर्व्ह वाढवत आहे. आणि ते आपल्या सोन्याच्या साठ्यात वाढ करत आहे आणि अमेरिकेच्या कर्जापासून (यू.एस. ट्रेझरी बाँड्स) दूर ठेवत आहेत.

**सोने बाजारात चीनचा दबदबा**

चीन सोन्याच्या बाजारात एक मोठी ताकद ठेवतो. मात्र या नवीन खरेदीमुळे एक नवीन लाट निर्माण झाली आहे ज्यामुळे चीनचा प्रभाव वाढला आहे. २०२२ च्या अखेरपासून सोन्याच्या किंमतीमध्ये ५० टक्के वाढ झाली आहे. उच्च व्याजदर आणि अमेरिकन डॉलरच्या वाढत्या मुल्यामुळे सोन्याचे भाव कमी होतात. पण यावेळी ते घडले नाही. डॉलरवरील अंवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न चीन बऱ्याच काळापासून आपल्या रिझर्व्ह फंडमध्ये विविधता आणत आहे आणि अमेरिकन डॉलरवरील आपले अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. गेल्या दशकात, चीनने अमेरिकन ट्रेझरी बाँडमधील गुंतवणूक कमी केली आहे. यावेळी, चीनने स्थानिक चलनाऐवजी (रेनमिन्बी) परकीय चलनांचा वापर करत सोने खरेदी केले आहे, जेणेकरून ते अमेरिकन डॉलर आणि इतर प्रमुख चलनापासूनची जोखिम करू शकतील.नवी रणनितीचीन सरकार आणि सामान्य लोकांच्या सोन्याच्या गुंतवणुकीवर विश्लेषकांचा असा अंदाज आहे की जर चीनने याच वेगाने सोने खरेदी सुरू ठेवली तर त्याच्या किमती आणखी वाढू शकतात. भविष्यात अमेरिकन डॉलरला पर्याय म्हणून चीन सोन्याला समोर आणण्याचे संकेतही मिळत आहे. जर असे झाले तर जागतिक अर्थव्यवस्थेत सोन्याचे महत्त्व अधिक वाढू शकते.

# आम्ही चर्चा करुन तोडगा काढू! ट्रम्प यांच्या त्या ऑफरला भारताचा नकार....

**वॉशिंग्टन डीसी:** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेली महत्वाची ऑफरला भारताने स्पष्ट नकार दिला आहे. . पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेच्या केलेल्या दौऱ्यात गुरूवारी ट्रम्प यांची भेट घेतली. त्यावेळी ट्रम्प यांनी भारत आणि चीन यांच्यात मध्यस्थी करण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र भारताने यास नकार दिला. भारताचे म्हणणे आहे की, आम्ही चर्चा करू आणि द्विपक्षीय बैठकीच्या माध्यमातून समस्येवर तोडगा काढू. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी द्विपक्षीय चर्चेद्वारे चीनसोबतचे प्रश्न सोडवण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. त्यांनी इतरांच्या मध्यस्थीची गरज नाकारली आहे. मिस्त्री यांना भारत आणि चीनमधील अमेरिकेच्या मध्यस्थीच्या प्रस्तावाबद्दल विचारण्यात आले त्यावेळी त्यांनी सांगितले की, आमच्या कोणत्याही शेजारी राष्ट्रासोबत आमचे जे की प्रश्न आहेत. ते सोडवण्यासाठी आम्ही नेहमीचे द्विपक्षीय चर्चेचाच मार्ग स्वीकारला आहे. भारत आणि चीनसाठी यात वेगळी भूमिका नाही. आम्ही प्रत्येक मुद्द्यावर द्विपक्षीय चर्चा करत आहोत आणि ती पुढे सुरू ठेवू. भारत- चीन विषयावर ट्रम्प काय म्हणाले होते? भारत- चीनच्या सीमेवर गेले अनेक दिवस तणाव आहे. याच संबंधी विचारण्यात आलेल्या प्रश्नावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी करण्याचा प्रस्ताव समोर ठेवला. ट्रम्प म्हणाले की, भारत- चीन सीमेवर होणाऱ्या संघर्षाला मी पाहतो. जे खूपच क्रुर असतात. मला असं वाटत ते सुरूच राहतील . जर मी मदत करू शकलो. तर मला ती करायला आवडेल. कारण हे थांबायला हवं. मात्र ट्रम्प यांनी व्यक्त केलेल्या



इच्छेवर भारताने त्वरीत भूमिका जाहिर करत अमेरिकेच्या मध्यस्थीला नकार दिला.बांगलादेशाबाबत भारताला दिला फ्री हँड पंतप्रधान मोदी यांच्या भेटीपूर्वी त्यांना बांगलादेश आणि भारतासंबंधी प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळी त्यांनी बांगलादेशाचे काय करायचं ते मी पंतप्रधान मोदींवर सोडतो असे म्हणत भारताला फ्री हँड दिला होता. त्यात अमेरिकेच्या हस्तक्षेपाला नकार दिला होता.

# राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ६ मोठे निर्णय, डान्सबार बंदी कायद्यावरही चर्चा....

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्य मंत्रिमंडळाची आज महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. तसेच विविध विभागांशी संबंधित असे ६ मोठे निर्णय या बैठकीत घेण्यात आले. या बैठीत डान्सबार बंदी कायद्याबाबतही चर्चा झाल्याची माहिती आहे. डान्सबार बंदी कायद्यात सुधारणा करण्याबाबत बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे. येत्या अधिवेशनात डान्सबार बंदी कायद्यात सुधारणा करण्याबाबतचं विधेयक मांडलं जावून मंजूर केलं जाण्याची शक्यता आहे. सुप्रीम कोर्टाने याबाबत काही सूचना केल्या होत्या. त्यानुसार नव्या कायद्यात सुधारणा अपेक्षित आहेत. येत्या अधिवेशनात याबाबतच्या दुरुस्ती होताना बघायला मिळतील. याचबाबत मंत्रिमंडळात चर्चा झाल्याची माहिती आहे. तसेच मंत्रिमंडळ बैठकीत सहा महत्वाचे निर्णय देखील घेण्यात आले आहेत. राज्य मंत्रिमंडळात घेण्यात आलेले ६ निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत सहावा राज्य वित्त आयोग स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वित्त खात्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय आहे.

जलसंपदा विभाग : म्हैसाळ उपसा सिंचन योजनेची ऊर्जा कार्यक्षमता वाढविणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी १ हजार ५९४ कोटींची मान्यता. या योजनेतून अवर्षण प्रवण भागात १ लाख ८ हजार १९७ हेक्टर क्षेत्राला सिंचन सुविधा.

गृह विभाग : अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सकरिता ३४६ नवीन पद निर्मिती व त्यासाठीच्या खर्चास मान्यता.

सार्वजनिक बांधकाम विभाग : राज्यातील रोपवेच्या




कामांसाठी राष्ट्रीय राजमार्ग लॉजिस्टिक व्यवस्थापन लि. ला आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यास मान्यता.

जलसंपदा विभाग : जळगांव जिल्ह्यामधील चाळीसगांव तालुक्यातील वरखेडे लोंढे (बँरेज) मध्यम प्रकल्पाच्या १ हजार २७५ कोटी ७८ लाख रुपयांच्या तरतूदीस मान्यता. चाळीसगाव, भडगाव तालुक्यातील ८ हजार २९० हेक्टर क्षेत्राला सिंचन सुविधा.

महसूल विभाग : पुण्यातील दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलला नाल्यावरील पुलाच्या बांधकामासाठी जमीन देण्यास मंजूरी.

दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे हे अनुपस्थित होते. त्यांच्या गैरहजेरीमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतंच धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत मोठं वक्तव्य केलं होतं. सिंचन विभागाच्या आरोपांप्रकरणी आपण राजीनामा दिला होता. त्यामुळे धनंजय मुंडे यांनी राजीनाम्याबाबत निर्णय घ्यावा, असं अजित पवार म्हणाले होते. अजित पवारांच्या या वक्तव्यानंतर धनंजय मुंडे खरंच राजीनामा देणार का? याबाबतच्या चर्चांना उधाण आलं आहे.

# तो माझ्या खूप जवळचा... विनोद मेहरांसोबतच्या लग्नाबद्दल रेखा यांनी केलेला खुलासा...



**मुंबई -** रेखा यांचं आयुष्य बाहेरून जितके सुंदर दिसते तितकंच ते आतून अशांततेने भरलेलं आहे. ना त्यांना वडिलांचं प्रेम मिळालं ना बालपण जगण्याची संधी मिळाली. कुटुंबाचा आनंद उपभोगू न शकलेल्या रेखा यांनी जेव्हा कुटुंब, पती आणि मुलं असण्याचं स्वप्न पाहिले. तेव्हा हे स्वप्नही कधीच पूर्ण होऊ शकलं नाही. त्यांनी आयुष्यभर प्रेमाची आस होती. तरीही, त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीच हास्य असतं. ज्यामध्ये त्याने त्याच्या संपूर्ण आयुष्यातील वेदना लपवल्या आहेत. रेखा त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे नेहमीच चर्चेत राहिल्या. विनोद मेहरासोबतच्या त्यांच्या लग्नाच्या चर्चा असोत किंवा अमिताभ बच्चन यांच्यासोबतच्या अफेअरच्या बातम्या असोत, रेखा यांचं आयुष्य नेहमीच प्रश्नांनी वेढलेलं असायचे, पण काही वर्षांपूर्वी त्यांनी या सर्व बाबींवर मौन सोडलं होतं. २००४ मध्ये, रेखा यांनी सिमी गरेवालच्या रेन्डेझव्हस विथ सिमी गरेवाल या शोमध्ये त्यांच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित अनेक प्रश्नांची उत्तरे दिली.७० च्या दशकात विनोद मेहरा हे असे अभिनेते होते ज्यांना पाहण्यासाठी लोक आतुर होते. एकीकडे त्यांचे चित्रपट पसंत केले जात होते, तर दुसरीकडे त्यांचं वैयक्तिक आयुष्यही चर्चेत होते. रेखा आणि विनोद रिलेशनशिपमध्ये होते असं म्हटलं जातं. असाही दावा केला जातो की, दोघांचं लग्न १९७३ मध्ये झालं होतं. जेव्हा रेखा यांना हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा त्यांना धक्काच बसला. त्यांनी हे स्पष्टपणे नाकारलं आणि म्हणाल्या की, हे खरं नाही. त्या म्हणाला, कोणीही काहीही बोलू शकतं. हे माझ्यासाठी महत्वाचं नाही, म्हणून मी यावर काहीही बोलू इच्छित नाही. तो नेहमीच माझा हितचिंतक होता आणि तो माझ्या खूप जवळचा होता.दरम्यान, रेखा यांचं नाव अमिताभ बच्चन यांच्यासोबतही जोडलं गेलं होतं. मात्र अनेक स्टार्सशी नाव जोडल्यानंतर त्यांनी १९९० मध्ये दिल्लीतील उद्योगपती मुकेश अग्रवालशी लग्न केलं. असं म्हटलं जातं की, ते नैराश्याने ग्रस्त होते आणि रेखा यांना हे लग्नानंतर कळलं. लग्नानंतर काही महिन्यांनीच, रेखा लंडनमध्ये असताना, मुकेश यांनी आत्महत्या केली.

# नेलपेंट लावत असाल तर सावधान! पचन ते हार्मोन्सचे वाजतील बारा, होईल कॅन्सर....

स्त्रिया आणि मुलींसाठी नेलपॉलिश म्हणजे त्यांच्या ब्युटी प्रोडक्टमधील महत्वाची गोष्ट!. काहीजणी नखांवर नेल पॉलिश केल्याशिवाय राहू शकत नाहीत, तर काही विशेष प्रसंगीच त्याचा वापर करतात. मात्र, सोशल मीडियावर असे दावे केले जात आहेत की नेल पॉलिशमधील केमिकल्स शरीरावर गंभीर परिणाम करतात. विशेषतः, ते मेंदू, पचनसंस्था, नर्व्हस सिस्टीम आणि अगदी मणक्याच्या हाडांवरही परिणाम करू शकतात. अशा दाव्यांमुळे अनेक महिलांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. खरोखरच नेल पॉलिश आरोग्यासाठी घातक आहे का? त्यातील घटक शरीरात कोणत्या पद्धतीने प्रवेश करतात आणि त्याचा परिणाम किती गंभीर असतो? हे जाणून घेण्यासाठी तज्ज्ञांचे मत तपासणे आवश्यक आहे. चला तर, यासंबंधी सखोल माहिती घेऊया. नेलपॉलिश आणि आरोग्यावर परिणाम सिद्धांत आयुर्वेद एंड पंचकर्म क्लीनिकचे



एमडी डॉ. अनय दवारे यांच्या मते, नेल पॉलिशमध्ये फॉर्मलडिहाइड, टोल्यून आणि डिब्युटाइल फ्थालेट () सारखी केमिकल्स असतात, जी दीर्घकालीन वापराने शरीरावर वाईट परिणाम करू शकतात. विशेषतः, नेल पॉलिशमधून बाहेर पडणाऱ्या विषारी वायूंमुळे श्वसनसंस्था प्रभावित होते. त्यामुळे काही लोकांना गळ्यात खवखव, दम्याचे लक्षणे किंवा त्वचेवर जळजळ होऊ शकते.

**कर्करोगाचा धोका**

नेल पॉलिशमध्ये आढळणारे काही घटक शरीरात जमा होऊन कर्करोग निर्माण करण्याची शक्यता वाढवतात. फॉर्मलडिहाइड हे त्यातील प्रमुख घटकांपैकी एक असून, ते एक संभाव्य कार्सिनोजेन मानले जाते. याचा दीर्घकालीन वापर शरीरातील हार्मोन्समध्ये असंतुलन निर्माण करू शकतो आणि कर्करोगाचा धोका वाढू शकतो.

**श्वसनासंबंधी समस्या आणि पचनसंस्थेवर परिणाम**

नेल पॉलिश लावताना त्यातून बाहेर पडणाऱ्या केमिकल्सचा वास अनेकांना त्रासदायक वाटतो. काही लोकांना त्यामुळे श्वास घेण्यास अडचण, नाक बंद होणे किंवा घशात खवखव जाणवू शकते. याशिवाय, जर एखादी व्यक्ती नख चावत असेल, तर हे केमिकल्स थेट शरीरात प्रवेश करून पचनसंस्थेवर परिणाम करू शकतात, ज्यामुळे अजीर्ण, उलट्या किंवा अतिसार होऊ शकतो.हार्मोनल असंतुलन आणि तंत्रिका तंत्रावर प्रभाव नेल पॉलिशमधील काही घटक शरीरात प्रवेश केल्यानंतर शरीरातील नैसर्गिक हार्मोनल चक्र बिघडवू शकतात. विशेषतः, महिलांमध्ये मासिक पाळीच्या तक्रारी वाढू शकतात. काही अभ्यासांनुसार, सतत नेल पॉलिशचा वापर तणाव आणि मेंदूच्या कार्यक्षमतेवरही परिणाम करू शकतो. नेलपॉलिशपासून होणारा धोका टाळण्यासाठी ते खरेदी करण्यापूर्वी त्यातील घटक तपासा. बऱ्याच कंपन्यांनी कमी-जोखीम असलेल्या घटकांसह नेलपॉलिश बनवण्यास सुरुवात केली आहे, परंतु तरीही तुम्ही ती फक्त कधीतरी कार्यक्रमानिमित्त वापरावी. नेलपेंट नेहमी वापरणं सुरक्षित नाही. एकदा नखांवर नेलपॉलिश लावली की लवकरात लवकर काढून टाका असा सल्ला डॉक्टर देतात. विशेषतः मुलांच्या हातावर नेलपॉलिश लावू नका

# दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप परीक्षेबाबत केले मार्गदर्शन



**जनसंचलन/ डोणगाव**

सातगाव म्हसला के. आर. पी माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांच्या १७फेब्रुवारी रोजी निरोप देण्यात आला. यावेळी जिजामाता महाविद्यालयाच्या अधिव्याख्यात्या डॉ. मनीषा राऊत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यालयाचे माजी प्राचार्य एस. एम. कानडजे, भारत शिक्षण संस्था देऊळगाव घुबेचे अध्यक्ष शेषराव घुबे, घोरपडे इंटरनॅशनलचे अनिल १७फेब्रुवारी रोजी केले होते कार्यक्रमाचे आयोजन घोर्पडे, माजी मुख्याध्यापक एकनाथराव घोर्पडे यांची भाषणे झाली. संत मुक्ताई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दिवानसिंग जाधव कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती आशा शिंदे, पोलिस पाटील गुणवंतीबाई पालकर, ग्रामपंचायत सदस्य संगीता पालकर, अंकुश बडक, रवींद्र बेन्डे, रामधन जाधव, कवरसिंग जाधव आदी उपस्थित होते.

# शेगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील दुकानावर रखवालदाराचा निर्घृण खून

**जनसंचलन/ लोणार**

शेगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील शहरातील दत्त मंदिर जवळ असलेल्या निलेश जैन यांच्याजैन पत्रा डेपोवरील वृद्ध रखवालदाराचा निर्घृण खून झाल्याची घटना १८ फेब्रुवारी२०२५ ला सकाळी उघडकीस आली. येथील जैन पत्रा डेपोवर बाबा मनसा पवार ( वय ७५ वर्ष ) राहणार देवठाणा तालुका मंठा जिल्हा जालना हे मागील पाच सहा वर्षांपासून ते रखवालदारीचे काम करीत होते. ते लोणार येथे पंधरा वर्षांपासून राहत होते. सदर घटनेची माहिती लोणार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निमिष मेहत्रे यांना मिळताच ते आपले सहकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश इंगोले पो. कॉ. नितीन खराडे लेखणीक गणेश लोंढे बिट जमदार संजय जाधव वाहतूक शाखेचे पंढरी गिते मनोज शेजूळ पो. कॉ. राहुल कायंदे चालक प्रवीण शिंदे सह घटनास्थळी पोहचले. या घटनेची माहिती त्यांनी आपल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिली. यावेळी अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी उप विभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटिल यांनी घटनास्थळी भेट दिली. तसेच बुलडाणा येथून श्वान पथक व ठसे तज्ज्ञ यांना पाचरणं करण्यात आले. यावेळी पंचनामा करत सदर मृतदेह ग्रामीण रुग्णालय लोणार येथे शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला पोलीस अधिकारी यांनी योग्य त्यां सूचना दिल्या. सदर पोलीस अधिकाऱ्यांनी सूक्ष्म निरीक्षण करत सदर दुकानाचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता ते बंद आढळून आले फिर्यादी सुमन अंबादास चव्हाण राहणार लोणार यांचे फिर्यादी वरून अपराध क्रमांक ५७ कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक निमिष मेहत्रे



लेखणीक गणेश लोढे करीत आहेत. मागील आठ ते दहा दिवसा अगोदर विविध वर्तमानपत्राने लोणार शहराला तिसऱ्या डोळ्याची गरज या मथळ्याखाली ठळक वृत्तांना प्रसिद्धी दिली होती यामध्ये शहराला सीसीटीव्ही कॅमेऱ्याची किती आवश्यकता आहे याबाबत वृत्तांकन केले असतानाही प्रशासनाकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही जर वेळीच सीसीटीव्ही कॅमेरे शहरात बसवले तर वाढत्या गुन्हेगारीला निश्चित आळा बसेल त्यामुळे सीसीटीव्ही कॅमेरा चा प्रश्न हा पुन्हा ऐरणीवर आला आहे

# शिवजयंती निमित्त रक्तदान शिबिर

**जनसंचलन/ राहेरी बु.**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राहेरी बुद्रुक येथील ग्रामपंचायत आणि शिवभक्तांच्या वतीने १८ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात राहेरी बु, गावातील रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यात युवकांचे प्रमाण सर्वाधिक होते. शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. जगदंब प्रतिष्ठान, समस्त गावकरी मंडळी आणि ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले. महिला आरोग्य केंद्र सिंदखेडराजा यांचे विशेष सहकार्य लाभले. रक्त संकलन जालना ब्लड बँकच्यावतीने करण्यात आले. रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.




# नक्शा पथदर्शी प्रकल्पाचा शुभारंभ

**जनसंचलन/बुलढाणा**

शहराच्या नगरपरिषद हद्दीतील मिळकतींचे नकाशे व मिळकत पत्रिका तयार करण्यासाठी केंद्र शासनाने बुलढाण्यात ङ्गनक्शाफ हा पथदर्शी प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाचा केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय व भूमि संसाधन मंत्री शिवराजसिंह चव्हाण, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या उपस्थितीत मध्यप्रदेशच्या रायसेन जिल्ह्यातून मंगळवारी ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला. या लाईव्ह कार्यक्रमाच्या माध्यमातून या प्रकल्पाचा जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी शुभारंभ झाला. या कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, भूमि अभिलेख उपसंचालक डॉ लालसिंग मिसाळ, उप विभागीय अधिकारी शरद पाटील, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख नरेंद्र झांबरे, जिल्हा सह आयुक्त जी.एस. पेंटे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गणेश पांडे उपस्थित होते. डिजिटल इंडिया भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम अंतर्गत ङ्गनक्शाफ हा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत असून हा प्रकल्प राज्यातील पंढरपूर (सोलापुर), बारामती (पुणे), कुळगाव बदलापूर (ठाणे), शिर्डी (अहमदनगर), वरणगाव (जळगाव), कन्नड (छ. संभाजीनगर), बुलढाणा, घुग्घस (चंद्रपुर), खोपोली (रायगड), मुर्तीजापुर (अकोला) या शहरात राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत नगरपरिषद भूमापन न झालेल्या जमिनीचे भूमापन करून मिळकत पत्रिका व मालमत्ता पत्रक तयार करण्यात येणार आहे. मिळकतीचा नकाशा व सिमा निश्चित होवून मिळकतीचे नेमके क्षेत्र माहित होईल, अशा मिळकत पत्रिका तयार करण्यात येणार आहे. तसेच नगरपरिषद हद्दीतील रस्ते, नगरपरिषदेच्या मालकीच्या खुल्या जागा, नाला यांच्या सिमा निश्चित करण्यात येईल. नगरपरिषद हद्दीतील कर आकारणी, बांधकाम परवानगी, अतिक्रमण निर्मुलन यासाठी अभिलेख व नकाशा उपलब्ध होवून सर्व कार्यपध्दती पारदर्शकपणे राबविली जाणार असून नागरिकांना अभिलेख सहज उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. नक्शा प्रकल्प हा नगरपंचायत, नगरपरिषद आणि महानगरपालिका क्षेत्रातील मूळ आणि विस्तारित भागांचे ड्रोन द्वारे सर्वेक्षण करून जीआयएस आधारित ३डी नकाशे आणि मिळकत पत्रिका तयार करणे. मिळकत कर नोंदवही अद्ययावत करणे. नगरपरिषद आणि भूमि अभिलेख विभागाकडील उपलब्ध सर्व प्रकारच्या नकाशांचे जीआयएस प्रणालीच्या माध्यमातून सुसूत्रीकरण करणे या तीन टप्प्यात राबविला जाणार आहे. धारक अधिकार अभिलेखाचे जीआयएस आधारीत नकाशे व मिळकत पत्रिका तयार होतील. मिळकतींचा नकाशा तयार होऊन त्यांचे क्षेत्र व अक्षांश-रेखांश सहित सीमा निश्चित होतील. नागरिकांच्या नागरी हक्कांचे संरक्षण होईल. मिळकत पत्रिकेच्या स्वरुपात अधिकार अभिलेख तयार झाल्यामुळे मिळकतीवर कर्ज घेणेची सुविधा उपलब्ध होईल. मिळकतीबाबतचे न्यायालयीन दावे कमी होण्यास मदत होईल. नागरिकांची आर्थिक पत उंचावण्यास मदत होईल. बुलढाणा शहरात ङ्गनक्शाफ हा पथदर्शी प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येणार असून त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश भूमि अभिलेख विभाग आणि नगरपरिषदेला देण्यात आले आहेत. शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ट्राफिक जाम होतेच कशी? तरुणाने थेट पोलिसाच्या कानशिलात लगावली, नाशिकमधील घटना...



**वृत्तसंस्था/ नाशिक**

दोन दिवसांपूर्वी रात्री आठ वाजेच्या सुमारास अमृत गार्डन चौकापासून कार्बन नाक्याकडे जाणाऱ्या अशोकनगर रस्त्यावर झालेल्या वाहतूक कोंडीवेळी पोलिसांशी हुज्जत घालणे तरुणाच्या अंगलट आले आहे. वाहतूक कोंडी होतेच कशी असे विचारून अंमलदाराला चापट मारल्याप्रकरणी अनिकेत भाऊसाहेब पवार (वय २७, रा. श्रमिकनगर) या संशयितावर गुन्हा नोंद आहे. त्याला सातपूर पोलिसांनी अटक केली असून, पुढील तपास सुरू आहे. वाहतूक शाखा युनिट तीनचे अंमलदार राजू खंडेराव गवळी (वय ५४) यांनी सातपूर पोलिसांत फिर्याद दिली आहे. गवळी हे रात्री आठ वाजेच्या सुमारास कर्तव्य बजावित असताना बेशिस्त वाहन चालकांमुळे वाहतूक कोंडी झाली. त्यावेळी वाहतूक नियोजनाचे काम गवळी करीत असताना दुचाकीवरून संशयित तेथे आला. त्याने तुम्ही शासनाचा पगार घेता तर वाहतूक कोंडी होतेच कशी, अशी तितारणा केली. त्यानंतर पोलिसांशी त्याने हुज्जत घालून अंमलदाराच्या डोक्यावर चापट मारली. यासह दमदाटी करून शासकीय कामात अडथळा आणून अंमलदाराला इच्छापूर्वक दुखापत केली. त्यावरून त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.दुचाकी देण्यास नकार दिल्याने टोळक्याने दुचाकीस्वाराच्या डोक्यात बिअरची बाटली फोडल्याची घटना श्रमिकनगर भागात घडली. गणेश आहिरे (वय २३), बाबू यादव (वय २०) व साहिल गांगुर्डे (वय २१, रा. श्रमिकनगर) अशी संशयितांची नावे आहेत. त्याबाबत समाधान तुळशीराम तालखे (रा. श्रमिकनगर) याने फिर्याद दिली आहे. तालखे सायंकाळी गंगासागर नगर भागातून दुचाकीवरून घराकडे जात असताना ही घटना घडली. याप्रकरणी सातपूर पोलिसांत गुन्हा नोंद आहे.






# कही खुशी, कही गमम! आई-वडिलांवर अश्लील टिप्पणी करणाऱ्या रणवीरला कोर्टाने फटकारलं...

**वृत्तसंस्था/मुंबई**

इंडियाज् गॉट लेटेन्ट या शोमध्ये पालकांवर आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने रणवीर अलाहाबादियाला फटकारले आहे. तसेच त्याला त्याचा पासपोर्ट जमा करण्यासही सांगितले आहे. मुंबई, आसाम आणि जयपूरमध्ये या प्रकरणात दाखल झालेल्या एफआयआरच्या संदर्भात न्यायालयाने त्याला अंतरिम दिलासा देत त्याच्या अटकेला स्थगिती दिली आहे. पण न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले आहे की, रणवीर अलाहाबादियाने जे काही म्हटले ते अत्यंत लज्जास्पद होते. पुढील सुनावणी पूर्ण होईपर्यंत रणवीर किंवा त्याचे सहकारी कोणताही कार्यक्रम सादर करू शकत नाहीत, अशी अट न्यायालयाने घातली. याशिवाय तो न्यायालयाच्या परवानगीशिवाय देश सोडून जाऊ शकत नाही. युट्यूबर आणि पॉडकास्टर रणवीर अलाहबादियाच्या वतीने वकील डॉ. अभिनव चंद्रचूड यांनी न्यायालयात उलटतपासणी घेतली. डॉ. चंद्रचूड हे माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांचा मुलगा आहेत. युट्यूबरने सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन कोटेश्वर सिंह यांच्या खंडपीठासमोर याचिका दाखल केली होती, तसेच वेगवेगळ्या राज्यांमध्ये नोंदवलेल्या प्रकरणांना एकत्र करण्याचे आवाहन केले होते. इंडियाज गॉट लेटेंट या शोच्या आधारे याचिकाकर्त्याविरुद्ध त्याच आरोपांवरुन कोणताही एफआयआर दाखल केला जाणार नाहीचौकशीत सहभागी होण्यास कोणताही धोका असल्यास, याचिकाकर्त्याला जीवन आणि स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र आणि आसामच्या स्थानिक पोलिसांशी संपर्क साधण्याचे स्वातंत्र्य असेल.जयपूरमध्ये इतर कोणताही एफआयआर नोंदवला गेला तर त्या एफआयआरमध्येही अटकेवर बंदी असेल.याचिकाकर्त्याला ठाणे पोलिसांकडे त्याचा पासपोर्ट जमा करावा लागेल.न्यायालयाच्या परवानगीशिवाय तो देश सोडून जाऊ शकत नाही.एकीकडे, मुंबई पोलिसांच्या सायबर सेलने रणवीर अलाहाबादियाला चौकशीसाठी अनेक वेळा समन्स पाठवले असताना, युट्यूबरने व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्याचे म्हणणे नोंदवण्याची विनंती केली होती. पण सायबर सेलने ते नाकारले आहे. दरम्यान, रणवीर बेपत्ता असल्याची बातमीही आली. यावर, युट्यूबने पुन्हा एकदा सोशल मीडियावर माफीनामा पोस्ट केला. रणवीरने त्याच्या असंवेदनशील आणि अपमानास्पद विधानाबद्दल पुन्हा एकदा माफी मागितली आणि खुलासा केला की त्याला आणि त्याच्या कुटुंबाला सतत जीवे मारण्याच्या धमक्या मिळत आहेत. त्यामुळे तो खूप घाबरला आहे.






दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958